# संगीत आणि आधुनिकता


## अशोक दामोदर रानडे


(मूळ प्रसिद्धी - साहित्य दिवाळी, १९८२)

काही संज्ञांना अंगभूत प्रतिष्ठा असते. त्यामुळे निरनिराळ्या संदर्भात आपण जयजयकार करीत राहतो. यात वावगे काहीच नाही. कारण अंगभूत प्रतिष्ठा काही अंगभूत गुण असल्याखेरीज लाभत नाही. संज्ञांच्या संदर्भातला अंगभूत गुण म्हणजे मानवी जीवनव्यवहाराच्या कोणत्या तरी जिवंत घटनासमूहांचे प्रतिनिधित्व करण्याची त्यांची क्षमता. आधुनिक या संज्ञेचे असे आहे. या संज्ञेमुळे मानवाच्या एकंदर सांस्कृतिक व्यवहारातील वर्तमानाच्या ओढीचे तत्त्व प्रगट होते. ही ओढ काही आज वा पन्नास वर्षापूर्वी पहिल्याने निर्माण झाली असे म्हणण्याचे कारण नाही. तसे म्हणण्याचे धाडस करण्याइतका पुरावाही नाही. त्यामुळे आधुनिकता ही संज्ञा आणि तिची लक्षणे स्पष्ट करणाऱ्या घटना नेहमीच घडणाऱ्या गोष्टी आहेत असे आढळून येते. कोणत्याही काळात आधुनिकतेचा आढळ आणि त्याविषयीची चर्चा सुरू झाली की सांस्कृतिक इतिहासाचा पट समोर असणाऱ्यास आपण पूर्वी येथे आलो होतो अशी भावना होऊ लागते याचे हेच रहस्य आहे.

मात्र आधुनिकतावाद आणि आधुनिकता या गोष्टी एकच नव्हेत हे समजून घेतले पाहिजे. प्रथम आधुनिकतेचा वावर व असर आणि मग आधुनिकतेच्या संदर्भातलेच पण इतर जीवन-व्यवहारांशी नाते सांगणारे अनुबंध निर्माण होणे म्हणजे आधुनिकतावादाचा प्रभाव असा हा प्रकार असतो. आणि हे तर्कसंगत आहे. खरे म्हणजे 'वाद' म्हणजे उलट-सुलट चर्चा इतकाच अर्थ नाही. वाद म्हणजे विशिष्ट कालखंडातील एकंदर सांस्कृतिक जीवन आणि त्या कालातील विशिष्ट जीवनक्षेत्र (इथे कला) यांचे नाते तपासत राहणे, त्याचा अन्वयार्थ लावणे, परंपरावाद, सौंदर्यवाद, आधुनिकतावाद, अभिजाततावाद इ. 'वादां'ची इथे आठवण करावयास हरकत नाही. हे वाद तत्त्वबोधासाठीच निर्माण होतात. युगधर्म म्हणता येईल अशा ताकदीचा व्यापक गुण वा गुणसमुच्चय कलानिर्माण, कलाग्रहण आणि कलासमीक्षा या कलाव्यवहाराच्या तिन्ही अवस्थात प्रभावीपणे वावरत असल्याचा साक्षात्कार अनेक संबंधितांना होतो आणि मग त्या गुणाचे वा गुणसमुच्चयाचे इतर जीवनव्यवहाराशी नाते जुळवून घेण्याचे प्रयत्न सुरू होतात. वाद निर्माण होतात ते अर्थ लावण्याच्या, संगती स्थापण्याच्या या क्रियाशील प्रक्रियेतून. व्यवस्था लावण्याची जी प्रेरणा कलाकाराच्या प्रयत्नांमागे असते तीच विचारवंतांच्या खटाटोपांमागेही असते. आणि म्हणूनच वादांमुळे तत्त्वबोध होण्याची शक्यता असते. सारांश, चर्चेपेक्षा वादाची आकांक्षा मोठी असते. त्याची साधनेही अधिक विविध असतात. चर्चा हे वादाचे एक साधन असेच खरे म्हणजे म्हणायला हवे. असो.

**संगीतातील आधुनिकता : दोन अंगे**

विशिष्ट कालखंडातील एकंदर जीवन व कलाविष्कार हातात हात घालून चालले आहेत किंवा नाहीत हा प्रश्न आधुनिकतेच्या संदर्भात नेहमी उभा राहतो. अर्थ असा की आधुनिकतेच्या संकल्पनेला दोन अंगे आहेत : एक कालसंबद्ध आणि दुसरे आशयसंबद्ध. आपण जेव्हा अर्वाचीन, समकालीन इ. संज्ञा कलेच्या संदर्भात वापरतो तेव्हा आधुनिकतेच्या कालिक अंगासंबंधी विचार मांडत असतो. परंपरागत, नव यासारख्या संज्ञा वापरल्या की आशयसंबद्ध अंगाकडचा कल आपण स्पष्ट करीत असतो.

संगीतात आधुनिकता आहे असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा वास्तविक पाहता या दोन्ही अंगांचा आढळ व्हायला हवा. आधुनिक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संगीताचे ग्रहण वर्तमानकाळातील संगीत म्हणून होत असते आणि आशयदृष्ट्या पाहता त्याची रचना आणि आविष्कार वर्तमानातील सांगीतिक गरजा पुऱ्या करत असतात.

**एक गुंतागुंत:**

परंतु एक गुंतागुंतीचा घटक विचारात घेतल्याशिवाय वरील सर्वसाधारण भूमिका स्वीकारता येणार नाही. संगीत म्हणजे काही केवळ कलासंगीत नव्हे. आदिम, लोक, नागर, जनताप्रिय आणि कलासंगीत इतके प्रवाह पुढारलेल्या समाजात वाहत असतात. या सर्व सांगीतिक भेदांच्या बाबतीत 'आधुनिकता' ही संकल्पना समान प्रमाणात लागू होत नसते. उदाहरणार्थ, एकंदर जीवनसरणीशी पूर्णतः गुंफला गेलेला, वेगळा करता न येणारा धागा म्हणून आदिम संगीत अस्तित्वात असते. त्यामागच्या प्रेरणा, त्याचे ग्रहण व त्याचे आविष्कार या सर्वांचाच अवतार जीवनाचे अविभाज्य घटक म्हणून होत असतो. म्हणून आदिम संगीताच्या बाबतीत आधुनिकता संभवत नाही. कारण ज्या संगीताच्या संदर्भात जीवनसरणी व संगीत यांची पावले परस्परांच्या तुलनेने मागेपुढे असणे संभवते त्या संगीताच्या संदर्भातच 'कालाबरोबर' राहण्याची भाषा संयुक्तिक ठरत असते. लोकसंगीताची अवस्था थोडी निराळी असते. या संगीतभेदात लौकिक, वा धर्मातीत भागही बराच असतो - आणि कालाबरोबर त्यात बदल होतातही. पण याही प्रकारावर कार्यबद्धतेची खेच असते. परिणामत: आदिम संगीतापेक्षा लोकसंगीतात आधुनिकतेचा प्रवेश संभवनीय वाटला तरी त्याचे प्रमाण कमी असते. आता राहिले तीन प्रकार : नागर, जनताप्रिय व कलासंगीत. पैकी नागर संगीत हे संपूर्णतः शहरी जीवनातील तत्कालीन गरजांनी आपले रूप धारण करत असते. मेळे, गाडीतील भजने, राजकीय घोषणागीते इ. आविष्कार या दृष्टीने तपासण्यासारखे असतात. जनताप्रिय संगीत हा संगीतभेद आकाशवाणी, दूरदर्शन, चित्रपट, ध्वनिमुद्रिका यांनी निर्माण केलेल्या वा यांच्याद्वारे प्रसारित होणाऱ्या संगीतामुळेच सिद्ध होत असतो. याची स्वरूपनिश्चितीच मुळी जनतासंपर्क-माध्यमांच्या सामाजिक-आर्थिक-सांस्कृतिक कार्यामुळे होत असल्याकारणाने या प्रकारात गृहीत धरण्याइतक्या अपरिहार्यतेने जीवनसरणीशी समकक्ष राहण्याची क्षमता आढळते.

राहिले कलासंगीत. प्रत्यक्ष जीवनसरणीचे दडपण कलासंगीतावर कमीत कमी प्रत्यक्ष असते. त्याच्या प्रेरणाही जास्तीत जास्ती अभौतिक असतात. मुद्दा असा की त्यात येणारी आधुनिकता ही मुख्यत: कलात्म निकषांची देणगी असते. कलाकृतीच्या अंतर्गत घटकांच्या बांधणीचे तर्कशास्त्र संगीताच्या प्रत्यक्ष प्रयोगात बदलत असते. काही काही वेळा असे घडते की हे बदल ऐतिहासिकदृष्ट्या भूतकालीन म्हणता येतील अशा पूर्वीच्या कालखंडातील सांगीतिक लक्षणांच्या पुनरावतारांनी सिद्ध होतात. उलटपक्षी काही वेळा हे बदल भविष्यात स्पष्ट होणाऱ्या प्रवृत्तींचे सूचन करतात असेही (नंतर) आढळून येते! कलासंगीताची आधुनिकता कशी खास गुंतागुंतीची असते हे यावरून ध्यानात येईल. शिवाय कलासंगीतातील विविध प्रकारांनीही या गुंतागुंतीत भर पडते. वेगवेगळ्या प्रकारांची आधुनिकता कमी अधिक असू शकते. कोणता प्रकार अधिक आधुनिक बनू शकतो याचे कोष्टक तयार करणे अर्थातच शक्य नाही. केवळ कलासंगीताचा विचार इथे अभिप्रेत नसल्याकारणाने त्या तऱ्हेच्या प्रयत्नाची आवश्यकताही नाही. तेव्हा आतापर्यंतच्या विवेचनाच्या पार्श्वभूमीवर एकंदर संगीतव्यवहाराच्या संदर्भात विचारपात्र ठरू शकतील अशी संगीताच्या आधुनिकतेची काही लक्षणे मांडता येतात का ते पाहू.

**१) नागरी अवतार**

आदिम आणि लोक या संगीतप्रकारांबाबत आधुनिकता संभवनीय नसते याचा उल्लेख करतानाच नागरीपणाचे लक्षण सूचित झाले आहे. संगीताचे इतर तीन भेद नगरांशिवाय इतरत्र असणाऱ्या मानवसमूहापर्यंत पोहचू शकतात पण तिथे त्यांची घडण होत नाही. नागर, जनताप्रिय आणि कला हे संगीतभेद नागरी जीवनामुळे संभवतात. वस्ती, खेडे, शहर, नगर, महानगर इत्यादी भेद आजही करता येतात. लोकवस्ती, वाहतुकव्यवस्था, शिक्षणसंस्था इत्यादींची विपुलता, शासनसंस्थांचे ठाणे असणे इत्यादी विविध निकष लावून नागर म्हणजे काय या प्रश्नाचे उत्तर सिद्ध होत असते. या व्याख्येला उतरेल असे मानवसमूहाचे भौगोलिक केंद्र ठरणारे ते नगर. या नगरातच आधुनिकतेचा आढळ, तिचा पाठपुरावा आणि तिचे मूल्यमापन या क्रिया पार पडतात. आधुनिकता ही संकल्पना म्हणूनच नागरी म्हटली पाहिजे.

**२) मार्गच्युति वा परंपराभंग**

आधुनिकतेचा अनुभव नेहमी मार्गच्युति वा परंपराभंग म्हणून येतो. मुळात परंपराभंग वा मार्गच्युति संगीतबाह्य म्हणता येतील अशा निकषांचा वापर करूनही आपली सुरुवातीची पावले टाकू शकते. पण शेवटी सांगीतिक व प्रयोगसंबंधित गरजा पुऱ्या करण्याचे सामर्थ्य नसले तर मात्र या मार्गच्युतीला वा परंपराभंगास स्थान मिळत नाही.

काहीशी विरोधाभासात्मक म्हणण्यासारखी घटना अशी की मार्गच्युति वा परंपराभंगाची प्रतीती पश्चातदृष्टीने पाहता वा सिंहावलोकनाचा अवलंब केला असता मात्र परंपरा चालू ठेवणारी तर्कपूत, तर्कसंगत म्हणून मार्गक्रमणात चपखलपणे बसू शकणारी घटनामालिका वाटू लागते. विशिष्ट कालखंडात ज्या कलाघटना क्रांतिकारक, उलथापालथ घडविणाऱ्या वा कलेचा रुढ मार्ग सोडणाऱ्या असतात त्याच घटना काही काळानंतर क्रांतिकारक वाटत नाहीत हा निरंतरचा अनुभव आहे हा प्रत्यय इतका निरपवादपणे येतो की आधुनिकतेच्या लक्षणातच त्याचा समावेश करण्याशिवाय गत्यंतर नाही.

असे का घडते? एक महत्त्वाचे कारण असे की जी घटना वा घटनामालिका आपल्याला आधुनिकतेच्या सूत्रास अनुसरून विशिष्ट कालियबिंदूत वा कालखंडात घडणारी क्रांतिकारक घडामोड म्हणून प्रतीत होत असते त्याच प्रकारची वा तशीच घडामोड आपण विचारात घेत असलेल्या कालावधीतसुद्धा बऱ्याच पूर्वी घडून गेली आहे असे सिंहावलोकन करता ध्यानात येऊ लागते. हे पूर्वीच कोणी तरी केले आहे वा अशा घटना पूर्वीच घडून गेल्या आहेत असे आढळल्यामुळे क्रांतीचा दावा अर्थातच पोकळ भासू लागतो. या परिस्थितीत जी क्रांति वाटत होती ती उत्क्रांति होती किंवा तो बदल होता असे मानणे एवढेच पर्याय राहतात. यात खटकण्यासारखे काहीच नाही. फक्त क्रांति या संकल्पनेची वा घटनेची आकर्षकता वाटते तेवढ्या मजबूत पायावर उभी ठाकलेली नसते यामुळे अस्वस्थ वाटण्याची शक्यता आहे!

**३) व्याकरणीय मार्गच्युति : आधुनिकतेचा राजमार्ग**

वरील विवेचनाच्या ओघातच ढोबळमानाने असे म्हणता येईल की संगीताला आधुनिकता मुख्यत: किंवा निदान प्रथमत: व्याकरणीय मार्गच्युतीच्या स्वरूपात समोर येत असते. मार्गच्युतीमागील प्रेरणा सौंदर्यशास्त्रीय असल्या तरीही प्रथम प्रत्यय येतो तो मात्र रूढ झालेल्या संगीतशास्त्रीय नियमांना दूर सारल्याचाच येत असतो. उदाहरणार्थ पारंपरिकदृष्ट्या मान्य असलेले ध्वनि, मान्य असलेला त्यांचा क्रम, त्यांच्या उपयोजनाविषयीचे मान्य संकेत इत्यादींना धक्का देऊन आधुनिकता नोंदली जाते हा सर्वसामान्य क्रम आहे.

व्याकरणाच्या उल्लेखाबरोबरच शुद्धतेचा निकष समोर येतो. 'शुद्ध कसे बोलावे व शुद्ध कसे लिहावे' हे व्याकरणामुळे समजते हा दादोबा पांडुरंगप्रणीत नियम भाषेपलीकडेही पोहोचतो! आधुनिक म्हटल्या जाणाऱ्या सर्व आविष्कारांवर पहिला आक्षेप घेण्यात येतो तो या आविष्कारांच्या अशुद्धपणाविषयी असतो हे या संदर्भात सहज ध्यानात येते.

व्याकरण म्हणताच ग्रंथनिविष्ट परंपरा हे लक्षणही ध्यानात घ्यायला हवे. कलाव्यवहाराबाबत नेहमी दोन तऱ्हेच्या धारा महत्त्वाच्या असतात : एक प्रयोगाधारित व दुसरी विद्वज्जन्य. पैकी दुसरीचे प्रतिनिधित्व ग्रंथनिविष्ट व्याकरण करत असते. आणि ही परंपरा नेहमीच प्रयोगपरंपरेशी फटकून आणि किंचित् मागे असते हा अनुभव नेहमीचाच म्हणता येईल. व्याकरण वाङ्मय वा साहित्याशी समकक्ष नसते तर ते किंचित मागे असते तसाच हा प्रकार असतो. संगीतव्यवहाराबाबतही हेच घडते. आधुनिक म्हणता येणारे, बहुतेक संगीताविष्कार ग्रंथनिविष्ट परंपरांपासून दूर गेलेले असतात याचे मूळ कारण  ग्रंथनिविष्ट होणारा कलाव्यवहाराचा भाग व्याकरणीय असतो हे होय. अर्थात् या बाबतीत खंत करण्याचे कारण नसते. कारण व्याकरण व प्रयोग यांचे संबंध विशिष्ट रीतीने समकक्ष नसणे अपरिहार्य इतकेच नव्हे तर एकंदर कलाव्यवहाराचा विचार करता उपकारकही असते. या दोहोत निर्माण होणारे अंतर फार नसावे म्हणून प्रत्येक पिढीस व प्रत्येक कालखंडास नव्या दमाचे व्याकरणकार लागतात. आणि स्थापित झालेल्या व्याकरणाच्या साच्यात कलाविष्कारांना कोंबले जाऊ नये; कलाकारांनी स्वत:ची, प्रयोगनिविष्ट परंपरा चोखाळण्याचे धाडस करताना मागेपुढे पाहू नये याचा क्रियाशील आग्रह धरणारे कलाकार निर्माण होणे हेही तितकेच गरजेचे असते. मुद्दा असा की व्याकरणकार व कलाकार हे दोघेही आधुनिकतेचा दावा करू शकतात. फरक इतकाच की व्याकरणकाराची आधुनिकता जाणवण्यासाठी संदर्भ म्हणून वापरावयाची परंपरा ग्रंथनिविष्ट व्याकरणाची असते तर कलाकार आधुनिक ठरावयाचा तर संदर्भ असतो तो दोन्ही सातत्यांचा : व्याकरणीय व प्रयोगनिष्ठ.

**आधुनिकतेची प्रयोगसंबद्ध लक्षणे:**

आतापर्यंत आधुनिकतेच्या ज्या लक्षणांचे विवेचन केले ती एका दृष्टीने पाहता सर्वसाधारण स्वरूपाची आहेत. म्हणजे असे की ती संगीतव्यवहाराच्या संदर्भात पुढे मांडली असली तरी इतर कलांनाही थोड्याफार फरकाने लागू पडण्यासारखी आहेत. त्यांच्या तुलनेने पाहता ज्यांना जास्त घट्टपणे संगीताच्या प्रयोगाशी निगडित असलेली म्हणता येतील अशीही आधुनिकतेची लक्षणे आहेत. त्यांचा विचार आता प्रस्तुत आहे.

**अ) रचनांतर्गत नवसंबंध :**

आधुनिकतेचे उदाहरण ठरणारे संगीतसुद्धा नादतत्त्वापासून फारकत घेऊ शकत नाही. या कारणाने नादतत्त्वाच्या आविष्कारांवर नियंत्रण ठेवणाऱ्या सर्वसाधारण लक्षणांची आधुनिक संगीतातही उचलबांगडी होत नसते. त्यांची पुनर्रचना मात्र होऊ शकते. उदाहरणार्थ स्वर, लय, ताल यांचे परस्परसंबंध बदलून टाकून रचना अवतरू शकतात. शिवाय या सर्व निखळ सांगीतिक तत्त्वांशी शब्द या साहित्यिक तत्त्वाची निरनिराळ्या प्रकारे नाती जुळविता येतात. आधारस्वर कायम ठेवायचा की नाही; तालाकृती बदलत जायचे की नाही; गरिमा, तारता व ध्वनिवैशिष्ट्य या नादतत्त्वांपैकी कशावर व कितपत भर द्यावयाचा; स्वरसंहति-तत्त्व अनुसरायचे की स्वरसंवाद पद्धतीने एकाधिक पेडांची रचना करावयाची यासारख्या पर्यायांना निरनिराळी उत्तरे शोधणे म्हणजे रचनेमधे संगीततत्त्वांची नव्या संबंधांवर आधारलेली बांधणी करणे होय. नवसंबंधांनी घटकांना नवा आशय प्राप्त होतो. कारण त्यांचा संदर्भ बदललेला असतो.

**ब) नवीन संगीतवाद्ये**

म्हटले तर ध्वनिवैशिष्ट्य या तत्त्वाचे रचनांतर्गत नवसंबंध जोडण्याच्या ओढीने पण अधिक तपशीलात पाहता विविध सांगीतिक, असांगीतिक कारणांमुळे आधुनिकतेचा आढळ नवीन संगीतवाद्यांच्या वापरात दिसून येतो. ही वाद्ये देशी-परदेशी असू शकतात. मुद्दाम नवीन वाद्ये तयार करून त्यांच्या योजनेने संगीतात आधुनिकतेची रुजवात करण्याचे प्रयत्नही केलेले आढळतात. याशिवाय रूढ वा परिचित वाद्यांच्या वादनपद्धतीत निराळेपण आणून नवीन ध्वनिपरिणाम साधण्याचे खटाटोपसुद्धा विपुल दिसतात. परिचित वाद्ये व रूढ वादनपद्धति कायम ठेऊन पण त्याच वाद्यांचे नवीन संदर्भात उपयोग करूनही आधुनिकता सिद्ध करण्याचा प्रयत्न वारंवार केलेला दिसतो.

काही काही वेळा तर वाद्य कोणी वाजवायचे यासारख्या बाबीतूनही आधुनिकता डोकावू शकते! इतर युक्त्यांच्या मानाने ही उथळ युक्ती वाटेल पण प्रयोगात हिच्यामुळे साधणारा परिणाम क्षणिक महत्त्वाचाच राहील असे सांगता येणार नाही.

**क) संगीतप्रकारांचा बदलता नकाशा**

संगीतातील आधुनिकतेची आणखी एक महत्त्वाची खूण म्हणजे रूढ संगीतप्रकारांच्या आपापल्या सीमारेषांसह जो एखादा विशिष्ट नकाशा कोणत्याही काळी संगीतपरंपरेत उपलब्ध असतो त्याच्या आकाररेषा बदलू लागतात. या तऱ्हेच्या बदलांमुळे संबंधित संस्कृतीत गदारोळ उठेल की नाही हे त्या त्या संस्कृतीच्या जिवंतपणावर, संवेदनशीलतेवर अवलंबून असते. संगीतप्रकारांची गल्लत करू नका, विशुद्ध आविष्कारांना तिलांजली देऊ नका इत्यादी प्रकारची हाकाटी होणे परवडले पण काहीच दखल घेतली न जाणे नशिबी नसावे! हॅलोला हलकट का होईना पण उत्तर असावे! रूढ संगीतप्रकारांच्या सीमारेषांची सरमिसळ होऊ लागली की काही वेळा घडणारा एक उपपरिणाम असा की सीमारेषांवरचे म्हणता येतील असे वेधक संयुक्त संगीतप्रकार निर्माण होतात. दोन वा अधिक संगीतप्रकार या प्रक्रियेत सहभागी होणे शक्य असते. अशा मिश्रणातून निर्माण होणारे प्रकार कलादृष्ट्या कसदार वा श्रेष्ठ ठरतीलच असे छातीठोकपणे सांगता न आले तरी ते निराळे ठरतात इतके तरी नक्की असते. विशेष नसले तरी वेगळे असतात आणि आधुनिकतेचा दावा करण्यास इतके पुरे होऊ शकते.

**ड) संयोगी कलाप्रकार**

संमिश्र वा संयुक्त संगीतप्रकारापेक्षा काहीशी निराळी घडामोड होऊन संगीत इतर कलांशी हातमिळवणी करते आणि संयोगी कलाप्रकार सिद्ध होतात. संगीत व नाट्य मिळून संगीतिका, नृत्य व संगीत एकत्र येऊन नृत्यनाट्य इत्यादी पद्धतीने हे प्रकार साकार होत असतात. एकत्र येणारे घटक हे स्वतंत्रपणे स्वयंपूर्ण कला असल्याकारणाने संयोगी कलाप्रकारांची निर्मिती ही घटना विशेष महत्त्वाची आणि आव्हान देणारी ठरू शकते. ललितकला, प्रयोगकला, साहित्यकला या त्रिविध प्रमुख कलागटांपैकी कोणत्या गटातील कला कोणत्या दुसऱ्या गटाशी हातमिळवणी करतात यावर एकंदर प्रक्रियेचे फलित अवलंबून असते. सर्वसाधारणतः असे दिसते की प्राचीन काळी सर्व वा अनेक कलांचा एकत्र आविष्कार होणे हा नियम होता. मग याची कारणे काहीही असोत. नंतर प्रत्येक कलेने आपापला सवतासुभा थाटण्याची प्रक्रिया सुरू होऊन कालांतराने ती बऱ्याच अंशी फलद्रूप झाली. मग पुन्हा एकदा निरनिराळया कलांनी एकमेकींच्या सहाय्याने नवनिर्मिती करण्याचा उपक्रम आरंभला आणि ही तिसरी अवस्था म्हणजे आधुनिकतेची खूण होय. एकंदर प्रक्रियेच्या या ढोबळ वर्णनातला तपशील देश-काल-परिस्थितीनुसार थोडाफार बदलेलही. पण तरीही सर्वसामान्यतः या घटना निरपवाद आहेत असे म्हणण्यास हरकत नाही. एकाच कलेतील प्रकारांचे मिश्रण होणे काय किंवा दोन वा अधिक निरनिराळया कलांचा संगम (वा विघटनही!) होऊन संयोगी कलाप्रकार निर्माण होणे असो - या क्रियांची फलिते कलात्मकदृष्ट्या श्रेष्ठ असतातच

असे सुचवायचे नाही. उलटपक्षी ती शुद्ध रूपे नसतात म्हणून कनिष्ठ असतात असेही म्हणावयाचे नाही हे स्पष्ट केले पाहिजे. संयोग-वियोगाच्या घटना अनिवार्य असतात इतकेच इथे नोंदवायचे आहे आणि आधुनिकतेबरोबर या तऱ्हेच्या बदलांची नाळगाठ राहते याकडेही लक्ष वेधण्याचा रोख आहे.

**इ) साहित्याबरोबरची वाढती घसट :**

प्रयोगबद्ध लक्षणे तपासताना असेही लक्षात येते की आधुनिकतेच्या ठळक होत जाणाऱ्या लक्षणांपैकी एक असे की आधुनिक संगीत साहित्यकलेशी अधिकाधिक नाते जुळवू लागते. [इथे साहित्य म्हणजे लिखित वा मुद्रित साहित्य - वाङ्मय वा मौखिक आविष्कार नव्हे हे मात्र ध्यानात घेणे जरूरीचे ठरेल.] कारण असे की विविध कलाबाह्य आणि कलांतर्गत परिस्थितीमुळे आधुनिकतेचा प्रवेश होत असता लिखितावरचा भरही हळूहळू पण निश्चितपणे वाढता राहतो. अर्थातच सर्व संगीतप्रकारांवर साहित्याचा प्रभाव सारख्या प्रमाणात पडतो असे नाही. पण तरीही कमीअधिक मानाने अर्थावर लक्ष देणे, उच्चारावर कटाक्ष ठेवणे, विविध काव्यप्रकारांना संगीताविष्कारांसाठी वापरणे यासारख्या बाबींचा आढळ संगीतव्यवहारात होऊ लागतो. परिणामी आधुनिकतेच्या संदर्भात संगीताच्या साहित्यात लिखितावर जोर देण्याची क्रिया सुरू असल्याची खात्री बाळगायला हरकत नाही. यावरून भाषेशी संबंधित असणारा संगीतव्यवहाराचा सर्वच भाग एकंदरीने अधिक सुजाणपणे पाहिला जात असतो असा सर्वसाधारण निष्कर्ष काढता येईल. संगीताची निर्मिती, संग्रह वा समीक्षा या सर्वच बाबतीत साहित्याची भूमिका आधुनिकतेचा अंमल सुरू झाला की वाढती राहते. मात्र, इथे केवळ प्रयोगसंबंधित अंगांचा निर्देश केला आहे, कारण समीक्षेचा विचार अलगपणे मांडला.

**ई) दुमुखी कलाकार**

निदानपक्षी एका बाजूने तरी प्रयोगाशी संबंधित राहणारे म्हणून आधुनिकतेचे एक संगीतलक्षण ध्यानात घेण्यासारखे आहे. आधुनिकतेच्या प्रभावाखाली आपली व्यक्तिगत कामगिरी नजरेत भरण्यासारखी दर्जेदार ठेवणारे कलाकार दुमुखी असतात. म्हणजे असे की आधीच्या वा जुन्या म्हणता येईल अशा परंपरेत ते वाढलेले असतात. शिक्षण, अभ्यास, गुरुपरंपरा इत्यादी अंगांनी पाहता त्यांचे आधीच्या युगाशी असणारे नाते घनिष्ठ असते. पण तरीही आधुनिक युगाच्या मागण्या कोणत्या, त्या पुऱ्या करण्यासाठी संकल्पन ते सादरीकरणापर्यंतच्या सर्व अवस्थांत कोणकोणते बदल कोणत्या प्रमाणात व कसे करावेत, असे बदल घडवूनही आपले कलात्मक स्वत्त्व व दर्जेदारपणा कसा राखावा यासंबंधीचा निर्णय हे दुमुखी कलाकार घेऊ शकतात. आणि या निर्णयांची अंमलबजावणी करण्याचे धैर्यही त्यांच्यात विपुलपणे आढळते. दुमुखी कलाकारात नेतृत्वगुण आढळतात असेही दिसते. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे तर असे म्हणता येईल की कलाकार आणि कला यांच्याशी ज्या एकलेपणाची, एकांडेपणाची वा संकुचित क्षेत्रांची आपण सांगड घालीत असतो त्यास दुमुखी कलाकारांमुळे लक्षणीय छेद जातो. अनेकदा हे कलाकार खेड्यात वा लहान गावात जन्माला येतात पण पुढे शहरात वगैरे वास्तव्य करू लागतात हाही केवळ योगायोग नव्हे.

**समीक्षेचे बदलते मोहरे :**

आधुनिकतेचे सर्वगामी लक्षणगीत संगीतनिर्मिती, प्रचार, ग्रहण याप्रमाणे समीक्षेतही ऐकू आल्याखेरीज राहत नाहीत. एकतर संगीतप्रकारांचा नकाशा बदलतो आणि त्यामुळे समीक्षेचे निकष बदलणे भाग पडते. कलाकार व कलाकृती यांच्याशी शक्यतो समकक्ष राहणे हे समीक्षा व समीक्षक यांचे जागते उद्दिष्ट असल्याकारणाने संगीतप्रकारांची सोपानपरंपरा बदलू पाहत असता समीक्षेचे स्वरूप पालटणे हे अपरिहार्य म्हटले पाहिजे. पण अधिक महत्त्वाची बाब म्हणजे या बदलामुळे बहुविध निकष वापरण्याकडे कल राहू

लागतो. आधुनिक समीक्षासंवेदनेस प्रत्येक कलाविष्कार इतका अनेकांगी आणि गुंतागुंतीचा प्रतीत होऊ लागतो की अनेक आणि विविध प्रकारच्या निकषांशिवाय कलाकृतीस आपण न्याय देऊ शकणार नाही ही मूळ प्रतिज्ञा ठरते. सूक्ष्मतेने पाहिल्यास असेही आढळते की आधुनिकतेचा स्पर्श झाल्यामुळे रुढ होणारी समीक्षा भाषाविज्ञान, मानववंश विज्ञान, मानसविज्ञान इत्यादि कलाबाह्य वाटणाऱ्या ज्ञानशाखांचा आधार घेऊन, संकरित संकल्पनांचे अनेक संच निर्माण करत असते. नवे निकष निर्माण न झाले तरी निदानपक्षी जुन्या निकषांची नवी संपादणी होऊ लागते आणि त्याही मागे कलेच्या क्षेत्राशी आजवर जवळीक न साधणाऱ्या ज्ञानशाखांचे अभ्यास डोकावतांना आढळतात.

आणखी एक स्वागतार्ह म्हणण्यासारखा समीक्षेचा विशेष असा की सारे निकष वा निकषांचे संच यांच्या उपयोजनात नव्या लवचीकपणाचा असर दिसू लागतो. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे तर असेही म्हणता येईल की अभिजातवाद, सौंदर्यवाद, वास्तववाद, इ. तऱ्हेचे नवीन वाद निर्माण झालेले दिसू लागतात, रस वा ध्वनि यासारख्या एखाद्या सर्वव्यापी सिद्धांतप्रणालीचा स्वीकार करून तिच्या एकछत्री अंमलाखाली समीक्षानिर्वाह चालविण्याच्या प्रवृत्तीत बरीच घट होताना दिसू लागते, नवीन वादही अर्थात कालांतराने दाठर होणे शक्य असते. पण तरीही, शतकानुशतके अजिंक्य वा अभेद्य वाटणाऱ्या सिद्धांतदुर्गांना खिंडारे पाडताना जेवढे खटाटोप आवश्यक ठरतात त्याच्याशी तुलना करता आधुनिक समीक्षावादांच्या दाठरपणावर उतारा शोधताना कमी कष्ट होतात.

आधुनिक संगीतसमीक्षेत इतर कलांच्या अस्तित्वाची जाणीव अधिक दिसते हाही तिच्या लवचिकपणाचा परिणाम म्हणता येईल. कदाचित असा एकदिश कार्यकारणभाव नसून दोन्ही लक्षणे एकमेकांमुळे शक्य होतात असे विधान करणे जास्त यथातथ्य ठरेल. प्रयोगात इतर कलांशी हातमिळवणी केली जाते म्हणून असो, साहित्याच्या वाणगुणामुळे संगीताविष्कारच आपल्या क्षेत्राबाहेर पडू पाहतो म्हणून असो वा आधुनिक संगीतकार मुळातच संपर्कमाध्यमांनी घडविलेला असतो म्हणून असो - इतर कलांविषयी तो अधिक जागरूक असतो आणि या सर्वांचे संकलित फलित समीक्षेच्या कार्यातही दिसल्याशिवाय राहत नाही. म्हटले तर आधुनिकता समीक्षेचे निराळेपण (तिच्या एकाधिक कलेतील आस्थेमुळे निर्माण झालेले) सौंदर्यसंकल्पनेविषयीच्या वा कलामूल्याविषयीच्या तिच्या आग्रहात दिसते. म्हणजे असे की कारागिरीपेक्षा कलात्मकता जात्या निराळी असते हा तिचा आग्रह असतो. एकंदरीने आधुनिकतेच्या निरनिराळ्या क्षेत्रातील कामगिऱ्यांपैकी समीक्षाक्षेत्रातील तिची कामगिरी अत्यंत भरीव वाटते हे नि:संशय.

**सामाजिक-आर्थिक स्वरूपाचे परिणाम :**

आधीच्या सर्व लक्षणांपेक्षा जास्तीत जास्ती कलाबाह्य म्हणता येतील अशी आधुनिकतेची लक्षणे या कोटीत अंतर्भूत असतात. पैकी पहिले महत्त्वाचे लक्षण म्हणजे आश्रयदात्यांमधला बदल हे होय. आधुनिकतेच्या प्रवेशाबरोबर संगीत आणि संगीतकार यांचा आश्रयदाता वर्ग अधिकाधिक संमिश्र होऊ लागतो. बहुसंध असलेल्या आश्रयदात्याच्या संगीतविषयक अपेक्षा वा कलाकाराने काय द्यावे या संबंधीच्या त्याच्या मागण्या अधिक विविध आणि त्याचप्रमाणे काही अंशी ढोबळ असतात. या परिस्थितीवर उतारा म्हणून, म्हणजे आश्रय संमिश्र असला, बहुमुखी असला तरी संस्कारित असावा, चोखंदळ असावा आणि परिणामत: कलाविष्कार नीटपणे किरण साधून सादर करता यावा म्हणून संगीतव्यवहारात अनेक युक्त्यांचा अवलंब केला जातो. उदा. संगीत मंडळ्या स्थापणे, तिकीटे लावून जलसे लावणे इत्यादी. या सर्व युक्त्यांचा उद्देश मात्र समान असतो: सरमिसळ आश्रयदात्यांच्या मागण्या पुऱ्या करण्याच्या प्रयत्नांमुळे कलाविष्कारात शिरणारा 'न-केंद्रित'पणाचा दोष टाळणे, निदान त्याची तीव्रता कमी करणे. आधुनिकता येणे म्हणजे एक द्विदिश प्रक्रिया सुरू होणे. व्यक्ती, वर्ग, समुदाय अशा क्रमाने आश्रयदाता बहुमुखी होत जाणे आणि त्याचबरोबर

समुदायाच्या सरमिसळपणावर मात करण्यासाठी आश्रयदात्यास निरनिराळ्या मार्गांनी एकसंध वा संघटित करण्याचा प्रयत्न ठेवणे होय. या परस्परविरोधी वाटणाऱ्या घटनांमधूनच आधुनिक श्रोतृवृंद आकाराला येत असतो. संगीत ही प्रयोगकला असल्याकारणाने आश्रयदात्या श्रोतेवर्गातील बदलाचा परिणाम संगीतकारावर व संगीतावरही होतो. श्रोत्यांचा प्रतिसाद हा स्वरूपनियंत्रक घटक म्हणून वावरतो आणि त्याचे कार्य तपासणे नि:संशयपणे महत्त्वाचे ठरते. एका विशिष्ट अर्थाने नागरी हेतूंनी प्रेरित झालेले श्रोते, प्रसारसाधनांचे स्वरूप, संपर्कमाध्यमांची कार्यपद्धती या सर्व आधुनिक लक्षणांचा आढळ संगीतव्यवहारात होऊ लागतो. या आधुनिक लक्षणांनी युक्त संगीत सांगीतिक तपशीलाबाबत पाहता निश्चित कोणते रूप धारण करते हा तपशीलवार चर्चेला घेण्याचा स्वतंत्र विषय आहे.

सामाजिक-आर्थिक अंगाचे म्हणण्यासारखे पुढचे लक्षण म्हणजे संगीतकारांची वाढती आंतरराष्ट्रीय वर्दळ. आधुनिकतेचा असर झालेला कलाकार आपल्या पंचक्रोशीबाहेरचे आश्रयदाते शोधतो. दीर्घकाळचे आणि अनेक प्रांतातील दौरे करण्याचा प्रघात पूर्वीही होताच. पण महत्त्वाचा फरक असा की आधुनिक कलाकार बाहेर पडतो तो निराळ्या संगीत-संस्कृतीतील दाद देणाऱ्या रसिकांच्या शोधात. या कारणाने वेषभूषा, सादरीकरण, गायन-वादनातील रचनांची सुगमता, आविष्कारासाठी लागणारा कालावधी इत्यादी अनेक बाबतीत संगीत बदलत जाते. शिवाय ही बदलसाखळी इथे थांबत नाही. परकीय वा परदेशीय श्रोत्यांपुढे कला पेश करण्याची सवय झालेले संगीतकार स्वकीयांपुढच्या आपल्या सादरीकरणातही निराळे बनतात. हा फरक हळूहळू होतो पण निश्चितपणे होतो. आंतरराष्ट्रीय होणे चांगले की वाईट इतक्या साधेपणे मांडण्याइतका हा प्रश्न सरळ नाही. एका दृष्टीने आंतरराष्ट्रीय होणे अपरिहार्य होय असेही म्हणता येईल. कसेही असले तरी या प्रकारच्या बदलाला तोंड देताना जो मूल्यनिर्णय करावा लागतो तो करणे सोपे नाही हे निश्चित. हा मूल्यनिर्णय करण्यासाठी आवश्यक ती सांस्कृतिक व शैक्षणिक पार्श्वभूमी तयार असणारे कलाकार दुर्दैवाने दुर्मिळ असतात आणि त्यामुळे बऱ्याच वेळा आधुनिक व म्हणून आंतरराष्ट्रीय होण्याची खटपट आरंभणारे अनेक कलाकार म्हणजे 'येनकेन प्रकारेण' पुढे येऊ पहाणारे कारागीर असल्याचे आढळू लागते.

आधुनिकतेमुळे कलाकाराची सामाजिक प्रतिष्ठा वाढते हे निर्विवाद सत्य आहे. याचे मुख्य कारण असे की कलाकार म्हणजे विशिष्ट कौशल्ये अंगी बाणल्यामुळे सामाजाची करमणूक करू शकणारा उपयुक्त घटक असे मानण्यापेक्षा आधुनिक समाज त्याला सांस्कृतिक महत्त्वाचा घटक म्हणून स्वीकारतो व त्यानुसार वागणूक देऊ लागतो. सामाजिक दर्जा संभाळून राहणारी व्यक्ती म्हणून आधुनिक कलाकार वावरू लागल्यामुळे कलाकारांची प्रतिमा, त्या प्रतिमेचे वर्धन, त्यासाठी आवश्यक भासणाऱ्या जाहिरात, मेजवान्या, मुलाखती, सत्कारसमारंभ या यंत्रणांची राबवणूक अपरिहार्य ठरते. सभा, परिषदा भरवणे; अर्ज-जाहीरनामे तयार करणे, शिष्टमंडळे वा प्रतिनिधिमंडळे घेऊन जाणे यासारख्या बाबी म्हणजे समाजाला प्रतिष्ठित वाटणाऱ्या पद्धतीने संघटना बांधून आवश्यक तेवढ्या प्रमाणात कलाकाराने आपल्या व्यक्तिगत अस्मितेस मुरड घालणे होय. कारागीर वा करमणुकीचे खेळ करणारा आश्रित म्हणून समाजाने आपली बोळवण न करावी यासाठी कलाकारास मोजावी लागणारी किंमत हे आधुनिकतेचेच सामाजिक-आर्थिक गमक होय. या घटनेचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम कलेच्या आशयावरही होतोच. पण प्रथमत: नजरेस येते ती कलाकाराची वाढलेली प्रतिष्ठा होय.

आधुनिकतेबरोबरच नवीन कर्मकांडाची रुजवात होते. आधुनिकता म्हणजे सुरक्षितता म्हणजे अंधश्रद्धा इ. चा नाश व म्हणून कर्मकांड नाहीसे होणे असा अन्वय लावणे असा सिद्धांत मांडणे हे केवळ अर्धसत्य सांगणे होय. दीक्षा, गुरुशिक्षा, गुरुपूजा, दक्षिणा इ. बाबतीतली जुनी कर्मकांडं आधुनिक युगात बाजूला पडतात ही गोष्ट खरी पण त्या जागी नवीन कर्मकांडांची स्थापना होते ही गोष्ट विसरून चालणार नाही. संगीताचा अभ्यास, त्याचे सादरीकरण, इतकेच काय त्याचे ग्रहणसुद्धा अनेक शारीरिक-मानसिक शक्तींच्या संतुलनामुळे शक्य होत असते आणि यासाठी आवश्यक ठरणारी एक प्रक्रिया म्हणजे कर्मकांडं पुरी करणे. याची जाणीव आधुनिक काळाइतकी एरवी क्वचितच जाणवली असेल. कर्मकांड धार्मिक नसली तरीही ती कर्मकांड असू शकतात. याच कारणांमुळे आधुनिकतेबरोबर नवीन कर्मकांडं येतात. वाढता जीवनवेग, जीवनसरणीतील गुंतागुंत, व्यक्तिगत जीवनातही समाज व शासन

यांच्याशी सहभाग साधण्याचे वाढते प्रसंग इत्यादी अनेक कारणांमुळे कर्मकांडांची गरज तीव्रतेने भासू लागली आहे. अशी कर्मकांडं मुद्दाम तयार केली जात नाहीत. पण समान तऱ्हेच्या मागण्या करणाऱ्या प्रसंगांशी निगडित असणाऱ्या पूर्वीच्या कर्मकांडांतून दुवे उचलून नवीन कर्मकांडं उत्क्रांत होतात. ती स्वीकारली जातात आणि त्यांची अंमलबजावणी केली जाते - पुन्हा नवीन कर्मकांडाची गरज भासेपर्यंत.

आधुनिकतेच्या विविध कोटींमधील खुणा नोंदताना काही प्रश्न मनात उद्भवतात. निदान संक्षेपाने ते टिपल्याशिवाय ही चर्चा पुरी होणार नाही. पहिला प्रश्न असा की प्रत्येक बदल म्हणजे आधुनिकता असे समीकरण मांडता येईल काय? याच प्रश्नाशी निगडित असणारा दुसरा प्रश्न असा की प्रगतीच्या संकल्पनेशी आधुनिकतेची सांगड घालता येईल काय?

प्रत्येक बदल म्हणजे आधुनिकता नव्हे. पण एका अर्थाने असे म्हणता येईल की प्रत्येक बदल आधुनिकतेचा दावा मात्र करू शकतो. कारण असे की आधुनिकतेच्या कालिक अंगाशी संबंधित अशी पौर्वापर्याची - एक आधीचे व दुसरे नंतरचे असण्याची - पूर्वशर्त कोणताही बदल सकृत्-दर्शनी पुरी करतच असतो. पण एवढ्याने भागत नाही. बदलास आशयसंबद्ध अंगाबरोबर समकक्षता साधता आली तरच आधुनिकतेची दुसरी पूर्वशर्त पुरी होते. असे ज्या बदलाबाबत होऊ शकत नाही - म्हणजे जो बदल फक्त कालिक दृष्ट्या 'आज'च्याशी समकक्षता साधतो त्याची बोळवण फॅशन, टूम म्हणून केली जाते. परंतु प्रत्यक्ष प्रतीतीच्या दृष्टीने पाहता असे होते की आधुनिकतेचे कालिक अंग लवकर सिद्ध होते व आशयसंबद्ध आधुनिकतेची दखल घेण्यास अधिक काळ लोटावा लागतो. यामुळे प्रत्येक बदल हा प्रारंभी आधुनिक म्हणून वावरू शकतो हे मान्य केले पाहिजे. थोडेसे विरोधाभासात्मक बोलावयाचे तर असे म्हणता येईल की कोणता बदल आधुनिकतेच्या पात्रतेचा आहे हे ठरविण्यासाठी पश्चातबुद्धीच कामाची असते!

आता प्रगती आणि आधुनिकता यांच्या संबंधांविषयी थोडेसे. प्रगती म्हणजे आपण काय समजतो यावर आधुनिकता प्रगतीपर असते का या प्रश्नाचे उत्तर अवलंबून राहणार. थोडक्यात सांगावयाचे तर प्रगती ही संकल्पना कलामीमांसेतली नाही. तिची पाळेमुळे आहेत राजकीय-आर्थिक विचारात. तिचे अंतिम व अमूर्त नाते शिवतत्त्वाशी असते. म्हणजे एखादी संगीतकृती कलाकृती आहे का हा प्रश्न न विचारता ती प्रगतिशील आहे का असे म्हणण्यात आपण कलामीमांसेबाहेर जात असतो. असे करणे वावगे नाही पण मग उत्तरे शोधण्याचे क्षेत्रही निराळे असते त्या कार्यासाठी वापरण्याचे निकषही निराळे असतात. प्रगतिशील कृती कलाकृती म्हणून श्रेष्ठ असेलच असे नाही. या उलट आधुनिकतेच्या दोन्ही अंगांचे पोषण नीट झाले असल्यास आधुनिक म्हणजे श्रेष्ठ कला असा निर्णय देता येईल.

सांगीतिक आधुनिकतेचे महत्त्व निर्विवाद आहे. तिच्यामुळे संगीतव्यवहारात घर करू पाहणाऱ्या साचेबंदपणाच्या धोक्यास प्रभावी उत्तर मिळते. म्हणूनच सांस्कृतिक विकसनशास्त्राची महत्त्वाची तत्त्वे जी कोणती असतील त्यात आधुनिकतेचा समावेश होणारच. आपल्याला आवडो वा नावडो आधुनिकतेचा दावा प्रत्येक बदल करणारच आणि निव्वळ कालिक अंग सिद्ध झाले एवढ्या जोरावरच हा बदल 'कलात्म' म्हणूनही काही काळ वावरणारच. कलेचे कालातीत स्वरूप सिद्ध व्हायचे, 'काल-आज'च्या एखाद्या ठिकाणी रुतून न बसण्याचे भाग्य लाभावयाचे तर काळाची चाळणी पार करावी लागते हा विरोधाभास मान्य करावा लागतो. या विरोधाभासाची ब्रह्मगाठ सोडविण्याकरिता उद्याचा हवाला न देऊ लागण्याची क्षमता फक्त प्रतिभावंतांना असते. म्हणजे असे की आज आधुनिक वाटणारी कोणती बाब भविष्यात मूलभूत व चिरंतन ठरेल हे तो आज हेरू शकतो!